# भारतीय जनता पार्टी - शिवसेना युती

१, जलाराम नगर, वल्लभबाग लेन, गांधी मार्केट समोर, घाटकोपर (पूर्व),
मुंबई - ४०० ०७७ टेलिफोन : २५१४ ७६३९, २५१४ ९९७८


कृपया प्रसिध्दीसाठी

२३ एप्रिल २००९

## <u>पिपल्स रिपब्लिकन पार्टी व रिपब्लिकन पार्टीचा किरीट सोमैया यांना जाहीर पाठिंबा</u>

ईशान्य मुंबईतील भाजपा-शिवसेना युतीचे उमेदवार डॉ.किरिट सोमैया यांनी प्रचारांच्या सर्व फेऱ्यात घेतलेली प्रचंड आघाडी, श्री.जोगेंद्र कवाडे यांच्या पिपल्स रिपब्लिकन पार्टी तसेच रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (विक्रोळी शाखा) यांनी सोमैयांना दिलेला पाठिंबा व गल्ली गल्लीत युतीच्या कार्यकर्त्यांनी लावलेला संपर्कचा धडाका यामुळे ईशान्य मुंबईत किरीट सोमैया यांच्याच आवाज बुलंद असल्याचा प्रत्यय येतो.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाने किरीट सोमैयांना जाहीर पाठिंबा देताना काढलेल्या पत्रकात म्हटले आहे की कॉंग्रेस हे जळत घर आहे, हे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी कोटयावधी जनतेला भाकीत भय इशारा दिला असताना, हयाच कॉंग्रेसने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना मध्य मुंबई व भंडारा येथून लोकसभा निवडणूकीत पराभूत करुन आपली काळी कपट निती दाखवून दिली होती.

पत्रक पुढे म्हणते अलीकडच्या काळात संपूर्ण देशाला काळीमा फासेल असे खैरलांजी हत्याकांड हयाच कॉंग्रेस राजवटीत घडत असताना तमाम दलित बहूजन बांधवांनी कॉंग्रेसची काळीकूट निती लक्षात घेवून येत्या लोकसभा निवडणूकीत कॉंग्रेस राष्ट्रवादीला मतांच्या रुपाने कायमस्वरुपी हददपार करावे. व भाजपा शिवसेना युतीचे कर्तव्यदक्ष कार्यसम्राट उमेदवार डॉ.किरीट सोमैया यांना लाखोंच्या मत्ताधिक्काने विजयी करुन व आपल्या जिवा भावाच्या लेकराला लाखोंच्या संख्येने मतदान करून दिल्लीच्या तख्यावर खासदार म्हणून पाठवावे.

या दोन रिपब्लिकन गटांनी दिलेल्या पाठिंब्याचा प्रत्यय रमाबाई नगर येथील प्रचार फेरीत आला. या प्रचार फेरीत किरीट सोमैयांचे स्वागत जोरदारपणे करण्यात आले व ३००० हूण अधिक नागरिकांनी जवळ जवळ दोन तास चालू असलेल्या प्रचार फेरीत शिवशक्ती भिमशक्ती जिंदाबाद व किरीट सोमैया आगे बढो रमाबाई नगर आपके साथ है अशा घोषणांनी आसमंत निनादून सोडले.


**दयानंद नेने**
9004028575




ईशान्य मुंबई उमेदवार : श्री किरीट सोमैया